MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात





बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२८४ | रविवार दि.०७ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -284 | SUNDAY DT. 07 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



**राजकमल, बाळराजे अजमेरा सह अन्य कंट्रक्शनने गेवराई मतदार संघातील रस्त्याची वाट लावत नंगानाच गेवराई तालुक्यातील निधीचा आमदाराच्या आशीर्वादाने गुत्तेदारांच्या घशात वाचा पुढील अंकात...**

## कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांच्या मतदारसंघात गुत्तेदारांच्या मनमानीमुळे

# रस्त्याच्या कामात बोगसगिरी

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार हे दर्जेदार रस्त्याचे जाळे विणणारे म्हणून कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांची ओळख निर्माण आहे. गेवराई तालुक्यात गत दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात रस्त्याचे काम झाले आहेत. परंतु काही ठिकाणी गुत्तेदारांच्या मनमानीमुळे काही रस्ते बोगस काम झाल्याचे दिसून येत आहे. पाच सहा वर्षांनंतरही चांगल्या स्थितीत रस्ते आहेत. याचे श्रेय आ.लक्ष्मण पवार यांनाच जाते मात्र गेवराई - चकलांबा महामार्गाचे काम चालू आहे. या रस्त्यावरील नदीच्या पुलाचे काम सुरू आहे. परंतु मागे झालेल्या पहिल्याच पावसात या मार्गावरील दोन पुल वाहून गेले होते. यामुळे वाहान धारकांना मोठ्या कसरतीने प्रवास करावा लागत होता. या रस्त्याचे काम उन्हाळ्यातच काम पुर्ण करणे अपेक्षित असताना, गुत्तेदारांच्या मनमानीमुळे हे काम अपूर्ण आहे. यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

गेवराई ते चकलांबा या महामार्गाचे काम हे अजमेरा कंट्रक्शन कंपनी करत आहे. या महामार्गार दरम्यान जवळपास पंधरा ते वीस नदी पुल आहेत. मात्र माटेगाव जवळील व एक राजपिंपरी जवळील असे दोन पुल पहिल्याच पावसात वाहून गेले होते. काही पुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. याचा त्रास या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांना तसेच छोटे-मोठे वाहान धारकांना होत आहे. पाऊस पडला की, गेवराई बस आगारातून येणारी गेवराई ते माटेगाव - पौळ्याचीवाडी - चकलांबा या बस बंद कराव्या लागतात. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना तसेच जेष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. याकडे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार हे काय एक्शन घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गेवराई ते माटेगाव या दरम्यान वाहनधारकांचा मोठ्या कसरतीने प्रवास
### आमदार साहेब, तुम्ही गेवराई ते चकलांबा या रस्त्यावरून एकदा प्रवास करून बघा..!

तसेच या रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वीच रस्त्याच्या बाजूने रस्ता उखरल्यामुळे रिमझिम पाऊस जरी झाली तरी रस्ता चिखलमय होत आहे. यामुळे दुचाकी धारकांना मोठ्या कसरतीने प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यापूर्वीच सदरील या रस्त्याचे व पुलाचे काम संबंधित गुत्तेगारांनी करणे आवश्यक होते. मात्र हे पावसाळ्यापूर्वी पूर्ण न झाल्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. याकडे रस्त्याचे काम करणारा संबंधित गुत्तेदार कारणीभूत असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



## मराठ्यांना कमजोर समजू नका, बीड जिल्ह्यातील मराठ्यांवरील त्रास थांबवा-मनोज जरांगे पाटील

छगन भुजबळ यांना दुसरे काही काम नाही, त्यांनी सर्व पडेल लोक गोळा केले आहेत. सर्वांना काय भाषण करायचं हे वाटून दिलंय. सरकारला मराठ्यांचा रोष परवडणार नाही. मराठ्यांना कमजोर समजू नका. बीड जिल्ह्यातील मराठ्यांवरील त्रास थांबवा, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. जरांगे पाटील यांनी आज शांतता रॅलेला सुरुवात केली आहे. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. मनोज जरांगे म्हणाले, आम्ही सरकारवर विश्वास टाकला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास टाकलेला आहे. त्यामुळे आमच्या मागण्या पूर्ण करा. अन्यथा आणखी मोठा जनसमुदाय उसळेल,असंही जरांगे पाटील यांनी म्हटलंय. मनोज जरांगे यांनी आज पासून मराठवाड्याच्या दौरा सुरू केला असून हिंगोली शहरात आता रॅलीला सुरुवात झाली आहे. रॅलीत मोठ्या प्रमाणात मराठा समाजातील नागरिकांची गर्दी पहायला मिळत आहे. सगळीकडे भगवे झेंडे आणि भगव्या टोप्या पाहायला मिळत आहेत.

मराठा आंदोलक मनोज जरांगे मराठवाडा दौऱ्यासाठी अंतरवाली सराटीतून रवाना झाले आहेत. मनोज जरांगे पाटील आज (दि.६) हिंगोली दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत हिंगोलीत आज मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅली निघाली आहे. एकटाच्या लढण्यात आणि करोडोंच्या लढण्यात खूप शक्ती असते, त्यामुळे मराठा समाजाने या शांतता रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जरांगे यांनी केलंय. आंदोलक म्हणून आशा बाळगणे माझे कर्तव्य असून आम्ही १३ तारखेपर्यंत सरकारवर आशा ठेवून असल्याचं जरांगे म्हणाले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासह अंतरवाली सराटीमधील सर्व गुन्हे मागे घेतील असा आम्हाला विश्वास असल्याचं जरांगे यांनी म्हटलंय. राजकीय इच्छा शक्ती असली तर ७ दिवस नाही, २ घंट्यात कायदेशीर टिकणारे निर्णय होऊ शकतात

# लोकसभा जाऊ द्या, एकदा मार बसला तो बसला

### गाफील राहू नका, ताक देखील फुंकून प्यायचे
### विरोधकांचा खोटा प्रचार मोडून काढा- मुख्यमंत्री शिंदे

मुंबई /प्रतिनिधी

लोक कोणाला मतदान करतात, हे समजून घ्या. लोकसभेच्या निवडणुकीचे जाऊ द्या. आपलं फेसबुक लाईव्ह नसते डायरेक्ट फेस टू फेस काम असते. काम करणाऱ्या लोकांनाच लोक मतदान करतात, आता ताक देखील फुंकून प्यायचे आहे. एकदा मार बसला, पण विरोधकांचा खोटा प्रचार मोडून काढायचा आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ते महायुतीच्या मेळाव्यात बोलत होते.

देवेंद्रजी माझ्या पाठिशी उभे राहिले

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्राने मोठा उठाव पाहिला. दोन वर्षे झाली त्याला आता धाडसी निर्णय घेतला. महायुतीचे सरकार स्थापन केले. ५० लोक सोबत होते, हजारो लाखो शिवसैनिक सोबत आले. देवेंद्रजी यांनी मला सहकार्य लाभले. बाळासाहेबांचे व दिघे साहेबांचे विचार सोबत होते. मोदी-शहा आमच्या पाठिशी उभे राहिले आहेत.




सर्व कामावरील ब्रेक उठवले

मुख्यमंत्री शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, सर्व कामे ठप्प होती. पण महायुतीचे सरकार आल्यानंतर त्याला ब्रेक उठवले. एकच चालू होते फेसबुक आणि वर्क फॉर्म होम सुरू होते. सरकार आल्यानंतर गोविंदा आला जोरदार साजरा केले. विकासाबरोबरच संस्कृती व परंपरा जोपासण्याला सुरूवात झाला. राज्यातील भविष्य उज्जल करण्याचा ध्यास घेतला आहे. तुम्ही सर्व आहात ही सर्व सरकारची ताकद आहे.

एकजूट दाखवण्याची गरज आहे. हे काम करणारे सरकार आहे. २७ बाय ७ हे सर्कल चालू आहे. कधीही काम करताना चालू करतात. प्रधानमंत्री महोदयांनी शिक्कामोर्तब केला आहे. हे सर्वसामान्यांचे सरकार आहे. गोरगरीबांचे आहे युवकांचे वारकऱ्यांचे सरकार आहे. वैयक्तिक लाभाचा निर्णय कधीही घेतला नाही. वैयक्तिक काहीही नको, राज्यातील सर्वांना चांगले दिवस आले पाहिजे, हाच आमचा प्रयत्न आहे.

# शिवसेनेच्या तलवाडा सर्कलप्रमुखपदी रमेश फलके यांची निवड

तलवाडा (प्रतिनिधी)

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तलवाडा सर्कलप्रमुखपदी रमेश फलके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित,यांच्या नेतृत्वाखाली निवड करण्यात आली आहे. लोकसभा निवडणूक झाल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बांधणी मजबूत करण्यासाठी नेहमी अग्रेसर असणारे सर्वसामान्यांच्या जनतेच्या कामासाठी येणारे तलवाडा सर्कल मध्ये सर्वांना परिचित असलेले राहेरी येथील रमेश बळीराम फलके, यांची शिवसेना सर्कल प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे .माजी राज्यमंत्री



बदामराव आबा पंडित यांचे हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी माजी बांधकाम सभापती युद्धजीत पंडित, शिवसेना गटनेते गोविंद दादा जोशी, शेख खलील ,शेख बादल,अब्दुलरहीम कुरेशी, सरपंच गोपनीथ फलके,मदन हाताळले,काकुराम कांबळे, प्रल्हाद फलके, दत्ता फलके, महादेव फलके, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.तलवाडा शिवसेना सर्कल प्रमुखपदी रमेश बळीराम फलके, यांची नियुक्ती झाल्याबद्दल सर्व पंचक्रोशीतील सर्व मित्र परीवार यांच्या वतीने शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



बीड - तपोवन फुलंब्री जिल्हा संभाजीनगर व बोरगाव येथील दिंडी जिल्हा संभाजीनगर सोमेश्वर मंदिर संस्थान येथे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थांचे अध्यक्ष नवनाथ शिराळे, माजी नगरसेवक दत्ताभाऊ पिंगळे, शेळके साहेब वांगी इत्यादी उपस्थित होते. यावेळी शिराळे अण्णा यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली.



# आषाढी एकादशीला गोदापात्रात पाणी सोडण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर -

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री पांडुरंगाचा वार्षिक आषाढी महोत्सव येत्या १७ जुलै रोजी संपन्न होत आहे.आषाढी वारी निमित्त श्रीक्षेत्र पैठण येथे नाथसमाधी दर्शनासाठी दरवर्षी जवळपास पाच लाख वारकरी,भाविक येत असतात .भल्या पहाटे पासून वारकरी,भावीक वर्ग गोदावरीत स्नान करून दर्शनासाठी जातात.

सध्या परिस्थितीत मात्र गोदावरी पात्रात पुरेसे पाणी नसल्यामुळे दिनांक १२ जुलै पूर्वी नाथसागरातून पूर्ण क्षमतेने पाणी सोडून पात्र भरून घेणे आवश्यक आहे. अशा आशयाची मागणी प्रतिसाद संघटनेने जिल्ह्याचे पालकमंत्री तथा खासदार संदीपान पाटील भुमरे यांच्याकडे दिनांक ५ जुलै शुक्रवारी पैठण येथे आले असता एका निवेदनाद्वारे केली.त्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात विष्णू ढवळे, रामचंद्र आहुजा, नानक वेदी, दिनेश पारिख, विष्णू म.गायकवाड, महेश पराड, नारायण म.साळुंखे,गणेश जुंजे, भाऊसाहेब पठाडे ,राजेंद्र बडसल आदी सहभागी होते.

यावेळी शिष्टमंडळाशी चर्चा करताना या विषयात तातडीने लक्ष घालत असल्याचे खासदार भुमरे यांनी शिष्टमंडळास सांगितले. मुख्यमंत्री शिंदे यांनी आषाढी वारीत वारकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले आहे.या बाबीची गंभीर दखल विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता नाथसागर प्रकल्प यांनी घेऊन गोदावरी पात्रात तातडीने पाणी सोडण्याची कार्यवाही करावी अशी मागणी विविध संघटनेने सुद्धा केलेली आहे.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी नवोदित विद्यार्थी आणि पालकांचे उत्साहात स्वागत

लातूर (प्रतिनिधी)

महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा तासिका प्रारंभ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पहार तर विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, नीट/जेईई/सीईटी समन्वयक प्रा. वनिता पाटील, समन्वयक प्रा. गिराम कल्पना, प्रा. स्वामी विश्वनाथ, प्रा. सोनोने रविंद्र. डॉ. घनश्याम ताडेवार, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. वैशाली जयशेट्टे, प्रा. दीपक बजाज, प्रा. शैलेश कानडे, प्रा. नागेश सुगरे, प्रा. परमेश्वर पाटील, प्रा. कामाजी पवार, प्रा. महादेवी पटणे प्रा. शुभांगी खुब्बा, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. सरस्वती बोरगावकर, प्रा. शितल झुंजे, कार्यालयीन प्रमुख नामदेव आणि पालक यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ बोडके, शुभम बिरादार, जगन्नाथ येचेवाड, संतोष राठोड, अनिता धनवडे, इम्तियाज शेख, अशोक शिंदे यांनी परिश्रम घेतले.




# पत्रकार नंदु गायकवाड यांना मातृशोक

बीड(प्रतिनिधी)

येथील जेष्ठ नागरिक श्रीमती अंजनाबाई सोपानराव गायकवाड यांचे शनिवार दि.६ जुलै रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. बीड येथील पत्रकार नंदु गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या.अंजनाबाई गायकवाड यांच्यावर गत सात दिवसापासून बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र शनिवार दि.६ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालावली. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात एक मुलगी दोन मुले, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे .बीड येथील पत्रकार नंदु गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या. गायकवाड परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग सहभागी आहे.



# अमरावतीच्या सेंट्रल जेलमध्ये स्फोट

## रात्री अचनाक झालेल्या बॉम्ब सदृश्य स्फोटानं खळबळ

अमरावती -: अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात कारागृहाच्या मागच्या बाजूनं जाणाऱ्या अमरावती-नागपूर द्रुतगती महामार्गावरून दोन बॉम्ब सदृश्य वस्तू फेकण्यात आल्या. यापैकी एक बॉम्बसदृश्य वस्तूही वर हवेतच फुटली. तर दुसरी बॉम्बसदृश्य वस्तू कारागृहाच्या आवारात पडली. सुदैवानं दुसरी बॉम्बसदृश्य वस्तू फुटली नाही. मात्र या संपूर्ण घटनेनं कारागृह प्रशासन हादरल.कारागृहात प्रचंड खळबळ : शनिवारी रात्री अमरावती मध्यवर्ती कारागृहात बॉम्ब सदृश्य वस्तू हवेत फुटल्यामुळं मोठा आवाज झाला. यामुळं कारागृहात तैनात अधिकारी आणि कर्मचारी आवाजाच्या दिशेनं धावून आले. त्यावेळी एक जिवंत बॉम्ब सदृश्य वस्तू बराक क्रमांक सहा आणि सातमध्ये पडलेली आढळून आली. यानंतर कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासह फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पथक तसेच बॉम्बशोधक पथक कारागृहात पोहोचले. बॉम्बशोधक आणि नाशक पथकानं कारागृहातील बराक क्रमांक सहा आणि सातच्यामध्ये पडलेली बॉम्ब सदृश्य वस्तू निष्क्रिय करून जप्त केल्याची माहिती सांगण्यात येत आहे.पोलीस म्हणतात फटाका फेकला : अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात दोन बॉम्ब फेकल्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. पोलिसांच्या वतीनं ही बॉम्बसदृश्य वस्तू बॉलच्या स्वरूपात असल्याची माहिती देण्यात आली आहे. कारागृहात कोणीतरी वरून बॉलच्या स्वरूपात फटाका फेकला. यापैकी एक फटाका वरच फुटला. तर बॉल हा कारागृहाच्या परिसरात आढळून आला. बॉम्बशोधक पथकानं हा बॉल जप्त केला असून फॉरेन्सिक युनिटची टीम या प्रकरणाचा तपास करेल, अशी माहिती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली. कारागृहात बारूद भरलेले बॉल नेमके कोणी फेकले? याचा तपास केला जात आहे, अशी माहिती देखील पोलीस आयुक्तांनी दिली.१९९२ मध्ये कारागृहाच्या मागे दहशतवाद्यांवर गोळीबार : अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात १९९२ मध्ये पंजाबमधील दहशवादी कैद होते. त्यावेळी कारागृहाच्या मागच्या बाजूला असणाऱ्या रामकृष्ण कॉलनीमध्ये एका घरात पंजाबमधील एक कुटुंब भाड्यानं राहत होतं. या कुटुंबाचा थेट पंजाबमधील दहशतवाद्यांशी संबंध होता. विशेष म्हणजे या कुटुंबाकडे पंजाबमधून पाच ते सहा दहशतवादी आले असताना त्यांच्या मागावर पंजाब पोलीस अमरावतीत पोहोचले. त्या घरातील दहशतवादी पकडण्यासाठी पंजाब पोलिसांनी सायंकाळी पाच वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत गोळीबार केला होता. त्या घटनेत एक पोलीस कर्मचाऱ्यासह दोन लहान मुलं ,दोन महिला आणि पाच पुरुष ठार झाले होते.

# तेलंगाना व महाराष्ट्र सीमेवर भरधाव वेगाने जाणाऱ्या टिप्परने ऑटोला उडवले!

सहा शेळ्याही दगावल्या

धर्माबाद (प्रतिनिधी)

तेलंगणा महाराष्ट्र सीमेवरच भरधाव वेगाने तेलंगाना राज्यात जाणाऱ्या टिप्परने तेलंगाना राज्यातील साठापूर व नवीपेठ येथून शेळ्या खरेदी करून घेऊन येणाऱ्या ऑटोला जोरदार धडक देऊन अक्षरशः उडवले असून यामध्ये ऑटो चालक जागेवरच ठार झाला असून इतर पाच जण अत्यवस्थ असल्यामुळे ग्रामीण रुग्णालयात त्यांच्यावर प्रथमपोचार करून त्यांना निजामाबादला पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आल. ही घटना सकाळी साडेअकराच्या दरम्यान तेलंगाना राज्य सीमेवरच घडली.

धर्माबाद वरून दगडी कोळसा खाली करून तेलंगाना राज्यातीलच एक टिप्पर अतिशय भरधाव वेगाने तेलंगाना राज्यात जात होते. त्याचवेळी आज शनिवार असल्यामुळे तेलंगाना राज्यात नवीपेठ व साठापूर येथे शेळ्या मेंढ्याचा मोठा बाजार भरतो तेथे शेळ्या खरेदी करून धर्माबाद येथील ऑटो चालकासह सहा जण येत होते. टिप्परचा वेग एवढा भयंकर होता की ६० ते ७० फूट त्यांनी ब्रेक लावल्याच्या नंतरही ऑटोचा पार चुराडा झाला. यावरून टिप्परच्या वेगाची अंदाज कळतो.

ऑटो चालक शेख मुजीम भाई राहणार सरस्वती नगर वय वर्ष ४८ ह जागेवरच ठार झाले. येथील बकरा मटन विक्रेता अशोक मुरारी यांचे सुपुत्र गणेश मुरारी वय वर्ष २८ यांचा पाय तुटून खाली पडला व डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे तो कोमात गेला. त्याला तातडीने उपचार करून तात्काळ निजामाबादला रेफर करण्यात आले. याच ऑटोमध्ये पिराजी लक्षमण आडकेकर राहणार रत्नाळी वय वर्ष ५०, रोहित ढाळे राहणार फुलेनगर वय वर्ष २२, राजेंना कट्टावाड वय वर्ष ६० राहणार रत्नाळी, व बालाजी कट्टावाड वय वर्ष २२ राहणार रत्नाळी या पिता-पुत्रांचाही अत्यवस्थ अवस्थेत समावेश असून उपरोक्त




पाचही जणांना वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर वेणुगोपाल पंडित, डॉक्टर श्रीमती मुनेश्वर व त्यांच्या सहकार्यांनी तातडीने प्राथमिक उपचार करून परिस्थितीचे गांभीर्य ओळखून निजामबादला रेफर केले.

सदरील टिप्पर चालक हा फरार असून घटनास्थळावर आजच रुजू झालेले नूतन पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे, श्रीमती प्रियंका पवार, यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळावर दाखल झाले होते. टिप्परला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सदरील वृत्त घेईपर्यंत चालू आहे.

सदरील अपघात ग्रस्त चुराडा झालेल्या ऑटोमध्ये ज्या शेळ्या मेंढ्या होत्या त्यामधील सहा शेळ्याही ठार झाल्या आहेत बाकीच्या शेळ्या मेंढ्या गंभीर अवस्थेमध्ये जाग्यावरच तळमळत आहेत.

# अंबाजोगाई शहराच्या शिवाजी चौक वीजवाहिनीवरील वीजपुरवठा बंद राहील

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

डिपीडीसी निधी अंतर्गत शहरातील वीजयंत्रणेच्या कामाकरिता शहरातील शिवाजीचौक वीजवाहिनीवरील काही भागांचा वीजपुरवठा रविवारी (दि.७ जूलै) सकाळी ०८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बंद राहील. संबंधीत वीजग्राहकांनी नोंद घेवून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.अंबाजोगाई शहरातील वीजयंत्रणेचे सक्षमीकरण करण्याकरिता डीपीडीसी निधी अंतर्गत मंजूर कामे करण्याकरिता ११के.व्ही शिवाजी चौक वीजवाहिनीवरील शिवाजी चौक,गुरुवार पेठ, सावरकार चौक,प्रशांत नगर,संभाजी राजे चौक, आंबेडकर



चौक,गवळीपुरा, पेशानपुरा ,रमाई चौक या भागातील वीजपुरवठा रविवारी सकाळी ०८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बंद राहील.वीज ग्राहकांनी याची नोंद घेवून महावितरणला सहकार्य करावे. सदरील देखभाल व दुरूस्तीचे काम निर्धारीत वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास त्वरीत वीज पुरवठा पुर्ववत चालू करण्यात येईल.




# दोन दुचाकींच्या अपघातात २ जण ठार;दोन महिला गंभीर

## पैठण रोडवरील कवडगावजवळील घटना

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

पैठण-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील कवडगावजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन जण जागीच ठार तर दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. ही घटना शुक्रवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास घडली आहे.अशोक कडुबा भालेराव (वय ३६ वर्षे, रा. मिसारवाडी, छत्रपती संभाजीनगर), प्रा. नामदेव कारभारी डफळ (वय ३५ वर्षे, रा. रोहतवाडी, ता. पाटोदा, जि. बीड) अशी मृतांची नावे आहेत, तर अनिता नामदेव डफाळ

अशोक भालेराव ,नामदेव डफळ(२९), नंदाबाई लहू पाखरे (वय ५०, रा. गुंतेगाव, ता. गेवराई, जि. बीड) या दोघी जणी गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमी अनिता या छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात आरोग्यसेविका म्हणून कार्यरत आहेत. प्रा. नामदेव डफळ पत्नीसह पैठणवरून संभाजीनगरकडे दुचाकीने

(एमएच ४१- बीबी ९३५०) जात होते, तर बिडकीनवरून भालेराव व नंदाबाई हे दोघे दुचाकीने (एमएच २०- जीएम ०१२४) पैठणकडे जात होते. या दोन्ही दुचाकी शुक्रवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास पैठण-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील कवडगावजवळ आल्यानंतर त्यांची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात या चारही जण गंभीर जखमी झाले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक अशोक माने, महादेव निकाळजे, संदीप धनेधर यांनी घटनास्थळी धाव घेत आहेत.तातडीने रुग्णवाहिकेतून जखमींना बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी डॉ. आशिष वेदपाठक यांनी अशोक व नामदेव यांना तपासून मयत घोषित केले, तर अनिता व मंदाबाई पाखरे या दोघींवर प्राथमिक उपचार करून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी बिडकीन पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अशोक माने करीत आहे.

# सेल्फीचा नाद महागात!:सुस्साट बाईकवर रिल काढताना भीषण अपघात

## १ जागीच ठार, एक गंभीर जखमी



बीड /प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून सेल्फीच्या नादात थरारक अपघाताच्या घटना समोर येत आहेत. अशीच एक घटना आता बीडमध्ये देखील घडल्याची माहिती आहे. या थरारक अपघाताचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. सेल्फीचा हाच नाद कधीकधी जीवघेणा ठरू शकतो त्याची प्रचिती या व्हिडिओवरून येत आहे.

एक ठार, एक जण जखमी

समोर आलेल्या व्हिडिओनुसार, दुकाचीकवरून प्रवास करत असताना एका व्यक्तीने रील काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही वेळातच अपघात झाला. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य एक जण गंभीर जखमी आहे. धुळे- सोलापूर महामार्गावर हा अपघात झाल्याची माहिती आहे.

(उर्वरीत पान २ वर)

# विधानसभेसाठी महायुतीने हुंकार भरला:फडणवीसांनी प्रवक्त्यांना झापल

## २०० जागा जिंकण्याचे गणितही सांगितले; अजित पवार म्हणाले- पराभवाचे चिंतन गरजेचे




मुंबई : प्रतिनिधी

लोकसभेनंतर आगामी विधानसभा निवडणुकांची तयारी राजकीय पक्षांनी सुरू केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा मुंबईतील षण्मुखानंद हॉलमध्ये पार पडला. या मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना एकत्रितपणे काम करण्याचे आव्हान केले. तर महायुतीतील सर्वच पक्षाच्या प्रवक्त्यांना कानपिचक्या दिल्या.

महायुतीच्या प्रवक्त्यांना सुनावलं

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज आपलाच एकमेकांत विसंवाद दिसतो, आज आपलेच प्रवक्ते एकमेकांवर बोलत असतात. जर कुणाला बोलायची खुमखुमी असेल त्याने आपआपल्या नेत्यांना अगोदर विचारावे. त्यांच्या नेत्यांनी होकार दिला तर आपली खुमखुमी पूर्ण करावी, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी नाव न घेता अमोल मिटकरींना टोला लगावला. यावेळी, अटलबिहारी वाजपेयी यांची कविता ऐकवली.

२५ लाख मतं मिळाली की विजय आपलाच

लोकसभा निवडणुकीपेक्षा २५ लाख मतं आपल्याला मिळाली की आपण २०० जागा जिंकू एवढं



# नव्या कायद्यांचा चार्ट व्हायरल

## एकाच पानावर सर्व कायदे; जाणून घ्या माहिती

देशात १ जुलैपासून तीन नवीन फौजदारी कायदे लागू झाले आहेत. जुन्या कायद्यांमधील काही कलमे निरस्त करण्यात आली आहेत. नवीन कलमे टाकण्यात आली आहेत. तर काही कलमांमध्ये बदल करण्यात आला आहे. काही कायद्यातील कलमांची संख्या कमीही करण्यात आली आहे. तसेच या तिन्ही कायद्यांना वेगळं नाव देण्यात आलं आहे.

नव्या कायद्यांचा चार्ट व्हायरल, एकाच पानावर सर्व कायदे; जाणून घ्या माहिती


देशात एक जुलैपासून तीन नवे फौजदारी कायदे लागू झाले आहेत. आता ५१ वर्ष जुन्या सीआरपीसीची जागा भारतीय नागरिक संहितेने (इछडड) घेतली आहे. भारतीय दंड संहितेच्या जागी भारतीय न्याय अधिनियम (इछड) आणि इंडियन एव्हिडन्स ॲक्टच्या जागी भारतीय साक्ष अधिनियम (इड-)च्या तरतूदी लागू झाल्या आहेत. महिलांशी संबंधित अधिक गुन्ह्यांमध्ये अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. आता इलेक्ट्रॉनिक सूचनेद्वारेही एफआयआर दाखल होणार आहे. या नव्या कायद्याचा चार्ट सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

देशात नवीन कायदे लागू झाल्यानंतर भारतीय न्याय संहिता २०२३चा एक चार्ट सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या चार्टमध्ये भारतीय न्याय संहितेचे सर्व कायदे देण्यात आले आहेत. एकाच पानावर हे सर्व कायदे देण्यात आले आहेत. कोणत्या गुन्ह्यासाठी कोणती कलमं लागू शकतात हे या चार्टमध्ये नोंदवण्यात आलं आहे. म्हणजे मारहाणीशी संबंधित गुन्ह्यात कोणतं कलम लागतं, महिलांसंबंधीतील गुम्ह्यात कोणतं कलम लागतं तसेच चोरी, लूट आणि इतर गुन्ह्यात कोणतं कलम लागतं याची माहिती ही या छोट्याश्या चार्टमध्ये देण्यात आली आहे.

तसेच भारतीय साक्ष्य अधिनियमात एकूण १७० कलम आहेत. नव्या कायद्यातून ६ कलम हटवली गेली आहेत. दोन नवे आणि ६ उप कलम नव्या कायद्यात जोडण्यात आली आहेत. यापूर्वी इंडियन एव्हिडन्स ॲक्टमध्ये १६७ कलम होते.

# मनोज जरांगे यांची हिंगोलीतून शांतता रॅलीला सुरुवात

## ३० फुटांच्या हाराने जंगी स्वागत!



हिंगोली : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण मिळवण्याच्या पार्श्वभूमीवर आजपासून शांतता रॅलीला सुरुवात केली आहे. मराठा आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीवर मनोज जरांगे ठाम असून त्यांनी आजपासून पुढील सात दिवसांची मुदत सरकारला दिलेली आहे. आज सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास हिंगोली येथून शांतता रॅलीला सुरुवात झाली आहे. सात दिवस ही रॅली राज्यभरात टप्प्याटप्प्याने घेतली जाणार आहे.

हिंगोलीकरांनी केले जरांगेंचे जंगी स्वागत

आज सकाळी मनोज जरांगे पाटील हिंगोलीतील शांतता जनजागृती रॅलीसाठी सकाळी समर्थकांसह अंतरवालीहून हिंगोलीकडे रवाना झाले आहेत. बळसोंड येथे सकाळी साडेदहाच्या सुमारास क्रेनच्या साहाय्याने ३० फुटांच्या फुलाच्या हाराने मनोज जरांगेंचे जंगी स्वागत केले. त्यानंतर सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असलेल्या परिसरात छत्रपती शिवरायांना अभिवादन करुन मनोज जरांगे पाटील शांतता रॅलीला सुरुवात केली. आज दुपारी ३ वाजता मनोज जरांगे यांच्या भाषणाने शांतता रॅलीचा समारोप होणार आहे. त्यानंतर ते पत्रकार परिषदही घेणार आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा - पोस्ट ऑफिस रोड - आखरे मेडिकल - खुराना पेट्रोल पंप चौक महात्मा गांधी चौक - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा (बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करतील) - महात्मा गांधीजींचा पुतळा (महात्मा गांधीजींना अभिवादन करतील) - पुढे इंदिरा गांधी चौक (जरांगे यांचे समारोपीय भाषण) असा असेल मनोज जरांगे यांच्या रॅलीचा मार्ग.

मनोज जरांगेंची शांतता जनजागृती रॅलीची सुरुवात आजपासून सुरु झाली आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात मराठा समाज सहभागी असल्याचे दिसून येत आहे. जरांगे आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे त्यांनी सरकारला मराठा आरक्षणाबाबत सात दिवसांची म्हणजेच १३ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. त्यामुळे विधानसभेत २८८ उमेदवार उभे करायचे की पाडायचे? हे १३ तारखेनंतर ठरवणार असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले.

# पक्ष कोणाचा ? चिन्ह कोणाचं ?

## विधानसभा निवडणुकीआधी होणार फैसला

**शिवसेना आणि त्यानंतर राष्ट्रवादी हे दोन मोठे पक्ष फुटल्याने राज्यात मोठा राजकीय भूकंप झाला होता. दोन्ही पक्षात दोन गट पडले होते आणि हा वाद सुप्रीम कोर्टापर्यंत गेला आहे. आता येत्या काही दिवसात सुप्रीम कोर्टाचा निकाल येण्याची शक्यता आहे. असीम सरोदे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीआधीच हा निर्णय येऊ शकतो.**

**विधानसभा निवडणूक आता काही महिन्यांवर आली आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटल्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना मोठा धक्का बसला होता. आधी एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्ष आणि चिन्ह गेलं त्यानंतर अजित पवार यांना देखील पक्षाचं नाव आणि चिन्ह मिळालं. त्यामुळे दोन्ही गटाने वेगवेगळ्या निवडणुका लढवल्या होत्या. पण यामध्ये अधिक फायदा उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या गटालाचा झालेला पाहायला मिळाला. पण विधानसभा निवडणुकीत चित्र काय असेल हे येणारी वेळच सांगेल. त्याआधी असीम सरोदे यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे.**



असीम सरोदे म्हणाले की, विधानसभा निवडणुका ऑक्टोबर नोव्हेंबरच्या दरम्यान होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचं? याबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालावर दोन्हीही पक्षाच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेल आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष फोडून राज्यपाल आणि राहुल नार्वेकर यांच्या मदतीने तो पक्ष पळवला आणि राहुल नार्वेकर यांनी सुद्धा निकाल एकनाथ शिंदे यांच्या बाजुने दिलाय. हे सर्व निकाल सर्वोच्च न्यायालयामध्ये चॅलेंज करण्यात आलेले आहेत. या सर्वाचा निकाल पुढच्या दोन ते तीन महिन्यात येण्याची शक्यता आहे.

ते पुढे म्हणाले की, 'विधानसभा निवडणुकांच्या आधीच पक्ष कोणाचा? चिन्ह कोणाचं?. पक्षाचे मूळ बांधणी करणारे कोण? याचा निकाल लागणार आहे. त्यामुळे खरं कोण आणि खोटे कोण याचा सुद्धा निकाल सुप्रीम कोर्टाकडून अपेक्षित आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने एकनाथ शिंदे यांच्या प्रकरणावरती जो निकाल दिलेला आहे, तो निकाल अत्यंत दुर्गामी परिणाम करणार आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राहुल नार्वेकर विधानसभा अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडे दिली होती. परंतु त्यांनी कायद्याच्या चौकटीत बसणारा निर्णया न देता, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अवहेलना केलेली आहे. त्यांनी भारतीय संविधाना सोबत फ्रॉड केलेला आहे.'

सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकर यांनी निकाल द्यावा असे का सांगितलं?

सरोदे म्हणाले की, 'पक्षांतर बंदी कायद्याच्या सहाव्या परिच्छेदामध्ये, पक्षांतर बंदी कायदा उल्लंघन करण्याच्या संदर्भातला विषय असेल, तेव्हा कोण पात्र आणि कोण अपात्र या संदर्भातला निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांनी घेतला पाहिजे असं सांगितलं आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने सर्व निर्णय घेऊन सुद्धा हे प्रकरण संविधानिक विश्वासाने राहुल नार्वेकर यांच्याकडे पाठवलं. पण राहुल नार्वेकर यांनी तसा निर्णय घेतला नाही.'

'नार्वेकर यांनी दिलेला निकाल हा अत्यंत अभूतपूर्व आणि अद्भुत असा आहे. कारण त्यांनी सांगितलं कोणीच अपात्र नाही आणि याचं कारण देताना त्यांनी म्हटलयं, हे पक्षांतर बंदी कायद्याचे प्रकरण नाही तर पक्षाच्या अंतर्गत वादाचे हे प्रकरण आहे. पण हे पक्षांतर बंदी कायद्यासंदर्भातल्या प्रकरण असल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने ते राहुल नार्वेकर यांच्याकडे पाठवलं आणि राहुल नार्वेकर म्हणतात हे पक्षांतर बंदीचे प्रकरणच नाही.'

'जर हे पक्षांतर बंदीचे प्रकरण नाही तर राहुल नार्वेकर यांना ह्याच्यावर निर्णय घेण्याचा अधिकारच नव्हता. त्यांनी काहीही निर्णय न घेता एक पत्र लिहून ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयाला परत पाठवायला हवं होतं. पण त्यांनी निर्णय घेतला. हा संविधानाची फसवणूक करणारा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात निकाल काय होणार हे स्वच्छपणे ठरलेला आहे. कायद्याच्या चौकटीत बसणारा निर्णय द्यायचा असेल तर शिवसेना आणि शिवसेनेचे धनुष्यबाण हे उद्धव ठाकरेंचं आहे हा निर्णय कायद्याच्या चौकटीत झाला पाहिजे. राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह ही शरद पवारांचेच आहे हा निर्णय झाला पाहिजे.'

# महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामात लाखोंचा भ्रष्ट्राचार

शेख आतिख/तलवाडा

नरेगा योजनेत बोगसगिरी करत कोणतेही कागदपत्रे आणि अभिलेखे नसतांना चौदा लाभार्थी यांच्या नावाणे गटविकास अधिकारी यांच्या परस्पर मोहगणी लागवड आणि जलसिंचन विहरीचे अकुशल बिल काढल्या नंतर कुशल बिल , व्हेंडर अधिकाऱ्याच्या परस्पर आणि नियम बाह्य केल्याने गेवराई पंचायत समिती सह तालुक्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामा बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणी दोन रोजगार सेवका सह चौदा लाभार्थ्यांना नोटिसा देवून खुलासा सादर करण्याचे आदेश गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे मॅडम यांनी दिला आसून या प्रकरणी पुढे काय कार्यवाही होते याकडे लक्ष लागले आहे.

गेवराई पंचायत समिती अंतर्गत नरेगा च्या कामात लाखोंचा अपहार झाला असून अभिलेखे आणि कोणतेही कागदपत्रे नसतांना लाभार्थी आणि गटविकास अधिकारी यांच्या परस्पर जवळपास एकश आहे एकसष्ट लाख रुपयाची कुशल बिले ऑनलाईन झाली असल्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निदर्शनास आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या मोहगणी लागवड आणि जलसिंचन विहिरीची कामे लाभार्थी यांच्या परस्पर त्यांच्या नावे लाभ उचलत त्यांच्या योजनेच्या कामावर मस्टर दाखवून पैसे उचलण्याचे काम झाले आहे.या प्रकरणात गेवराई पंचायत समिती आवारातील एक सेतू केंद्र चालक यांच्या सह आणखी एक महिलेच्या नावाने एककम जमा झालेल्या आहेत परंतु ज्यांच्या नावाने योजनेच्या फाईली आहेत त्या लाभार्थ्यांना माहिती नसल्याची चर्चा असल्याने हा अपहार नेमका कोणी केला,या मगे कोणता अधिकारी अथवा पुढारी आहे का हे लवकरच समोर येणार आहे.हे सर्व झाले असताना मोहगणी लागवड आणि जलसिंचन विहीर च्या कोणत्याच कागदपत्रांचा संच नसतांना अभिलेखे नसतांना कुशल बिलाचे देयके तयार करून व्हेंडर खाते ऑनलाईन केले असल्याचे एम आय एस वर दिसत असल्याने एकसष्ट लाख अठ्ठावीस हजार आठसे शाऐनसी रुपयाचा अपहार होत असल्याचे निदर्शनास आल्याने गत विकास अधिकारी गेवराई यांनी दोन रोजगार सेवक यांच्या सह चौदा लाभार्थी यांना नोटीस देवून खुलासा मागितला आहे ,जर हा खुलासा सादर केला नाही आणि अभिलेखे उपलब्ध केले नाहीत तर शासनाची फसवूनु केल्या प्रकरणी ४२० नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे म्हंटले आहे.

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीकस्पर्धा

बीड (प्रतिनिधी)

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी,बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल या पिकांसाठी पीकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पिक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास स्वतःच्या शेतावर स्पर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पिक स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतक-यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

अर्ज कोठे करावा व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

बक्षिसाचे स्वरूप- सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील पीक निहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षीस रक्कम पुढीलप्रमाणे आहे. स्पर्धा पातळी सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये पहिले दुसरे तिसरे तालुका पातळी ५,००० ३,००० २,००० जिल्हा पातळी १०,००० ७,००० ५,००० राज्य पातळी ५०,००० ४०,००० ३०,००० खरीप हंगाम सन २०२४ पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी सहभाग घ्यावा, या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, संकेतस्थळ- ु.ज्ञीळीहळ.ारहरीरीहींीर.सीिं.ळप किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन रविंद्र बिनवडे, भाप्रसे, आयुक्त (कृषी ) महाराष्ट्र राज्य,यांनी केले आहे.

# जिल्ह्यात १७ जुलै रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड (प्रतिनिधी)

मराठा , ओबीसी, धनगर व इत्तर समाजाचे विविध उपोषणे, आंदोलने, सभा सुरु असून विधीमंडळ अधिवेशन तसेच जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मिरवणुका, मोर्चे,निदर्शने, आंदोलने, धरणे रस्ता रोको या सारखे अंदोलने सुरु असून किरकोळ कारणाकवरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ३.७. २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १७ जुलै २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.


जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# परभणी-परळी दुहेरी रेल्वेमार्गाला गती

**परळी / प्रतिनिधी**

**केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पात मंजुरी मिळालेल्या परभणी-परळी दुहेरीकरण रेल्वे मार्ग कामाला खऱ्या अर्थाने गती मिळाली असून या दुहेरीकरण मार्गासाठी जमीन आधिग्रहन करण्याची अधिसूचना रेल्वे मंत्रालयाने काढली आहे. या दुहेरीकरण मार्गासाठी एकूण ७७० करोड रुपये निधी मंजूर झाला असून परळीकडून गंगाखेड मार्गावरील जमीन अधिग्रहण करण्यात यावी याची अधिसूचना काढण्यात आली आहे.**

दक्षिण मध्य रेल्वे विभागातील विविध मार्गावर दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाची कामे जलदगतीने पूर्ण केली जात आहेत.परभणी जंक्शन येथून पूर्णा, जालना सोबतच परळीकडे जाणारा मार्ग आहे. परभणी-परळी या रेल्वे मार्गाचे एकूण अंतर ६४.७१ किलोमीटर एवढे आहे. परभणी-परळी या मार्गावर दररोज १५ ते २० रेल्वे गाड्या धावतात. या सोबतच परळी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी लागणाऱ्या कच्च्या कोळशाची मालगाडीद्वारे वाहतूक करण्यात येते.या मार्गावरील रेल्वेगाड्याची वर्दळ जास्त असल्याने अनेक वेळा परळी स्थानकापासून जवळच असलेल्या वडगाव निळा या ठिकाणी क्रॉसिंगमुळे तासनतास उभ्या असतात यामुळे या मार्गावर दुहेरीकरण करण्याची मागणी प्रवाशीवर्गातून वारंवार करण्यात आली होती.याकडे रेल्वे विभागाकडून या मार्गावर दुहेरीकरणं करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे देण्यात आला होता.सन २०१०-११ मधील अर्थ संकल्पात यास मंजुरी मिळाली असून याकामी जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.याबाबत रेल्वे मंत्रालयाने दि १८ जून २०२४ रोजी काढलेल्या राजपत्रानुसार परळी रेल्वे स्थानक भागातून गंगाखेडच्या दिशेने असलेल्या आझाद नगर,सिमेंट कारखाना, बरकत नगर, मिलिंद नगर आदी भागातील अनेक जमिनी अधिग्रहण करण्यात



येणार आहेत.


परभणी-परळी रेल्वे मार्गाचा समावेश दुहेरीकरण कामासाठी केला होता. त्यानंतर प्रत्यक्षात कामासाठी निधी मिळाला नसल्याने हे काम अपूर्णच राहिले. सदरील काम पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी ७७० कोटी रुपये मंजूर झाल्याने या मार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाच्या दक्षिण मध्य रेल्वे विभागाकडून १८ जून २०२४ रोजी भूमी अधिग्रहण करण्याची अधिसूचना काढली आहे.या मार्गावरील जमिनीचे अधिग्रहण होऊन प्रत्यक्षात लवकरच कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

मोजमाप फीस विचारना पत्र भूसंपादन विभागाला प्राप्त

दक्षिण मध्य रेल्वे विभागाकडून परळी उप विभागीय कार्यालय येथे अधिग्रहण करण्यात येणाऱ्या जमिनीचे मोजमाप करण्यासाठी आकारण्यात येणारी फीस काय असणार आहे याची माहिती भु संपादन विभागाला विचारणा करणारे पत्र मिळले असून लवकरच मोजमाप करण्याचे फीस भरून प्रत्यक्ष मोजमाप सुरू होणार आहे.

या सर्वे नंबर मधील जमिनी होणार अधिग्रहण - परळी शहर व शहरालगत असलेल्या ८३, ८३/२, ९६, ९६/१, ९८, ९८/१, १००/१, १००/१/२, १००/१/३, १००/२/१, १००/२/२, १००/२/३, १०१, १०१/२/२, १०४/१, १०४/२, १०५, १०६/१/१, १०६/१/२, १०६/२/१, १०६/२/२, १०७/१, १०७/२, १०९/१, १०९/२, १४४/१/१, १४४/१/२, १४४/१/३, १४४/१/४, १४४/१/५, १४४/२/१, १४४/२/२, १४५, १४५/१/१, १४५/१/२, १४५/१/३, १४५/२/१, १४५/२/२, १५३/१/१, १५३/१/२, १५३/१/३, १५३/१/४, १५४/२/१, १५३/२/२, ४६, ४६/२, ५०/१, ५०/१/२, ५०/१/३, ५०/१/५, ५०/१/७, ५०/२, ५०/२/१, ५०/२/२, ५०/२/३, ५०/४, ५०/६, ७५/१, ७५/१/१०, ७५/१/११, ७५/१/१२, ७५/१/१३, ७५/१/१५, ७५/१/१५, ७५/१/१६, ७५/१/१७, ७५/१/१८, ७५/१/१९, ७५/१/२०, ७५/१/२१, ७५/१/२२, ७५/१/२३, ७५/१/५, ७५/१/३, ७५/१/४, ७५/१/६, ७५/१/७, ४९/१, ४९/२, ७५/१/८, ७५/१/९, ७५/२/१, ७५/२/३, ७५/२/४, ७५/२/५, ७५/३/१, ७५/३/२, ७६/३/३, ७५/४/१, ७५/४/१०, ७५/४/२, ७५/४/३, ७५/४/४, ७५/४/५, ७५/४/६, ७५/४/७, ७५/४/८, ७७, ७८/१, ७८/२, ७८/३, ७९/१, ७९/२, ७८/३, ८०/१ या सर्वे नंबर / गट नंबर मधील सुमारे २.०७ हेक्टर जमीन मोजमाप करून रेल्वे विभाग अधिग्रहण करणार आहे.

# अभिनेत्री प्रिन्सेस डॉली घोक्षे सोनीच्या थरारक मालिकेतून जबरदस्त भूमिकेत



## दररोज दिसणार 'गुन्ह्याला माफी नाही ' मध्ये

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या भूमिकन्या सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रिन्सेस डॉली घोक्षे या आता सोनी मराठी या वाहिनीवरील थरारक मालिकेतून एका जबरदस्त भूमिकेत येत आहेत. सोनी मराठी या वाहिनीवर सुरू असलेल्या, गुन्हेगारीवर आधारित प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या 'कारण गुन्ह्याला माफी नाही' या मालिकेत प्रिन्सेस डॉली घोक्षे महत्त्वाची भूमिका साकारीत असून सोमवार दि. ८ जुलै पासून दररोज सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता त्यांचा कसदार अभिनय रसिकांना पहायला मिळणार आहे.सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शक राजेश वराडकर यांनी दिग्दर्शित केलेल्या

या मालिकेची निर्मिती सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शिका मनवा नाईक यांनी केली असून सुप्रसिद्ध अभिनेते हरिश दुधाडे हे प्रिन्सेस डॉली घोक्षे यांच्यासोबत या मालिकेत प्रमुख भूमिकेत आहेत.प्रिन्सेस डॉली घोक्षे यांनी तारक मेहता का उल्टा चष्मा, रानबाजार, स्वामी समर्थ, ताराराणी, बाळूमामा, अबोली, पोस्ट ऑफिस उघडं आहे, डब्बा कार्टेल आदी जवळपास पंचवीस मालिकांमधून आणि ओटीटीच्या वेबसिरिज मधून महत्त्वाच्या भूमिका साकारल्या असून अभिनय, लेखन, दिग्दर्शनाचे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. पुढील काळात येणाऱ्या अनेक प्रकल्पांचे ही त्यांनी करार केलेले आहेत.प्रिन्सेस डॉली या प्रसिद्ध साहित्यिक- रंगकर्मी प्रा. बापू घोक्षे यांच्या सुकन्या असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# न्यायासाठी दीर्घ लढा

## फ्लॉट खरेदी केला ३७१.७४ चौरस मिटर, परंतू अंकगणितीय चुकीमुळे भुमापन विभागात झाली होती केवळ ३३१ चौ. मी. ची नोंद, १९८२ पासुनच्या पाठपुराव्याला २०२४ मध्ये आले यश

जालना/ प्रतिनिधी

सरकारी काम आणि सहा महिने थांब... अशी म्हण प्रचलित आहे. त्याचा प्रत्यय एका ८५ वर्षीय शिक्षिकेला आला. त्यांनी जालना शहरात १९७५ मध्ये ३७१.७४ चौरस मिटरचा प्लॉट खरेदी केला. परंतू, नगर भुमापन विभागाच्या नोंद वहित याचे क्षेत्र केवळ ३३१ चौरस मिटर इतकेच नोंद झाले. १९८२ मध्ये बांधकाम सुरु करताना शिक्षकेला हा प्रकार समजला आणि त्यांनी आपल्या मालमत्ता पत्रात क्षेत्र दुरुस्तीसाठी पाठपुरावा सुरु केला. वयाच्या ४३ वर्षी घराचे बांधकाम सुरु करायचे होते तेव्हा सुरु केलेल्या त्यांच्या या पाठपुराव्याला ८५ व्या वर्षी यश आले. घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही मात्र प्रशासनासोबत दिलेल्या दीर्घ लढ्याला यश आले यात मोठे समाधान असल्याचे या शिक्षिकेने म्हटले आहे.

हा संघर्ष आहे सुधाबाई विष्णुपंत फडके यांचा. १८ व्या वर्षी त्या रेल्वेच्या शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. जालना शहरात आपले स्वत:चे घर असावे म्हणून त्यांनी ९ सप्टेंबर १९७५ मध्ये स्टेशन रोडवर ३७१.७४ चौरस मिटरचा एक फ्लॉट विकत घेतला. त्यांचे पती बांधकाम विभागात कार्यरत होते तर त्यांना दोन मुली आणि एक मुलगा होता. पुढे १९८३ मध्ये त्यांनी या प्लॉटवर बांधकाम करण्याचा निर्णय घेतला. जेव्हा बांधकाम सुरु केले तेव्हा नगर भुमानच्या नोंदीत त्यांचे क्षेत्र केवळ ३३१ चौरस मिटर असल्याची नोंद आढळून आली. जवळपास चारशे चौरस फूट जागा कमी झाल्याने त्यांनी तातडीने नगर भुमापन,भुमी अभिलेख विभागात अर्ज देऊन पाठपुरावा सुरु केला. मात्र कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांच्या अर्जावर प्रशासनाने निर्णय घेण्याचे टाळले आणि यास विलंब होत गेला. काही दिवसांनी सुधाबाई फडके परभणीत स्थायिक झाल्या. पती विष्णुपंत आणि नंतर मुलाचेही निधन झाले. आता दोन लेकींचा सांभाळ,त्यांचे शिक्षण आणि नोकरी करीत त्यांनी आपला प्रशासनासोबतच संघर्ष सुरुच ठेवला. पुढे दोन्ही मुली उच्च शिक्षण घेऊन प्राध्यापक झाल्या. चारशे चौरस फूट जागा कमी तर कमी, आहे तो फ्लॉट विकूण टाकू असे म्हणत जावई आणि लेकींनी त्यांना आता हा पाठपुरावा नको म्हणून गळ घातली. परंतू, सुधाबाईंनी आपला संघर्ष सोडला नाही. विशेष म्हणजे महसूलच्या कायद्यांची फारशी माहिती नसल्याने त्यांनी क्षेत्र दुरुस्ती आणि अपीलीय अधिकार यासंदर्भातील पुस्तके विकत घेऊन हे कायदे माहित करुन घेतले. त्यांच्या सततच्या या पाठपुराव्याला ४२ वर्षानंतर यश आले असुन अभिलेखात तशी दुरुस्ती करण्याचे आदेश २६ जून २०२४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

अखेर न्याय कसा मिळाला

लोकसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या धामधुमीत एप्रिल २०२४ मध्ये नेहमीप्रमाणे सुधाबाई फडके जिल्हाधिकारी कार्यालयात आल्या. तेथे निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांची त्यांनी भेट घेतली. वायाळ यांनी अर्धा तास वेळ देत त्यांच्यासोबत बसुन त्यांची सर्व फाईल चाळली. आता आमच्या मागे खुप धापवळ आहे तुम्ही लोकसभा निवडणूक संपल्यावर या असा निरोप देत आरडीसी वायाळ यांनी त्यांना परत पाठवले. नंतर मे महिन्यात त्या पुन्हा वायाळ यांच्याकडे आल्या. वायाळ यांनी संबंधीत विभागाला आवश्यक त्या सूचना केल्या आणि त्यांचे काम मार्गी लागले.

कधी कुणाची भेट घेतली याचा ठेवला लेखाजोखा

सुधाबाई फडके यांनी ४२ वर्षात सरकारी कार्यालयात हजारो चकरा मारुन उंबरठे झिजवले. हे करीत असताना त्यांनी प्रत्येक भेटीची नोंद ठेवली. कोणत्या दिवशी कोणत्या अधिकाऱ्याची भेट घेतली याचा सर्व लेखाजोखा त्यांनी लिहून ठेवला आहे. विशेष म्हणजे त्यांच्या प्लॉटचे क्षेत्र नगर भुमापन मध्ये कमी दिसत असल्याने त्यांच्या शेजारी



असलेल्या प्लॉट धारकारने दुय्यम मालमत्ता पत्रक तयार करुन सुधाबाईंचे उर्वरित क्षेत्र हडपण्याचा प्रयत्न केला. परंतू, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी ते दुय्यम मालमत्ता पत्रक रद्द करुन सुधाबाईंना त्यांच्या हक्काचे सुधारीत मालमत्ता पत्रक दिले.

न्याय मिळाला यात मोठे समाधान

सोहम वायाळ हा अधिकारी मुलाप्रमाणे मदतीला आला आणि त्याने सर्व कामे बाजुला ठेऊन माझ्या अर्जावर निवाडा दिला. असाच अधिकारी ४२ वर्षापूर्वी भेटला असता तर माझ्या घराचे स्वप्न साकार झाले असते. घर बांधायसाठीच मी प्लॉट विकत घेतला होता. मात्र, एका अंकगणितीय चुकीमुळे इतका मनस्ताप सहन करावा लागला. आता, ८५ व्या वर्षी मी कशाला घर बांधणार?, परंतू, न्याय मिळण्यासाठी जो मोठा संघर्ष केला आणि त्याला यश आले यात समाधान आहे.

सुधाबाई फडके, निवृत्त शिक्षिका,परभणी

त्यांची जिद्द पाहून थक्क झालो

सुधाबाई फडके निवडणूकीच्या धावपळीत मला भेटल्या. मी त्यांची कागदपत्रे पाहिली, जवळपास तासभर बसुन त्यांनी केलेल्या पाठपुराव्याची माहिती देत होत्या. त्यातून आम्ही भुमी अभिलेख विभाग, नगर भुमापन विभाग या सर्व अधिकाऱ्यांकडून सुधाबाईंची फाईल मागवली. मूळ फाईल गहाळ झाली होती, त्यांच्याकडे असलेल्या झेरॉक्स कागदांवरुन आम्ही नवी संचिका तयार केली.सर्व कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास केला नंतर हे प्रकरण जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांनी नुकतेच क्षेत्र दुरुस्तीचे आदेश दिले असुन त्यानुसार नगर भुमापन मध्ये नोंद केली आहे. शिवाय भुमी अभिलेख मधील गहाळ झालेली फाईल आता सापडली आहे....सोहम वायाळ,निवासी उपजिल्हाधिकारी,जालना.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT